श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] कार्तिक शके १८४५ [ अंक ९ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादक — लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशक — [illegible]
श्री साईलीला कचेरी ५ [illegible] रोड, दादर, बी. बी. [illegible]

(२६.)

वांद्यास आदम नांवाचा गृहस्थ घरांच्या दलालीचें काम करीत असतो. एका कामांत त्याचेंवर व दुसरे दोघांवर फौजदारी खटला झाला. व खटला सेशनकमीट होणार असा रंग दिसूं लागला. आदम अतिशय घाबरला व गोंधळून गेला. ज्या दिवशीं म्याजिष्ट्रेटपुढें निकाल व्हावयाचा होता त्या दिवशीं सकाळीं तो तेंडूलकरांचेकडे गेला व महाराजांचे तसबिरीसमोर जाऊन म्हणाला "बाबा तुम्ही माझ्याकडे पाहून हंसत आहात. मी चारसहा महिने तुरूंगांत गेलों तरी तुम्हांला सोडणार नाहीं. मी जाणार असें मला खास दिसतें पण मी खरोखर निरपराधी आहें हें तुम्हाला ठाऊक आहे. तुम्ही मला सोडविलें पाहिजे." तो तेंडूलकरांचें व सौ.सावित्रीबाईचें पायां पडला व बराच रडला. नंतर थोडयाच वेळानें सावित्रीबाईची व आदमची गांठ रस्त्यांत पडली. तेथें त्यानें बाईचें पाय धरिलें व म्हणूं लागला "बाबा मला सोडवतीलच असें तुम्ही म्हणा." व कांहीं केल्या पाय सोडीना. शेवटीं बाई म्हणाल्या "होय बाबा तुला सोडवतील." पुढें तो कोर्टांत गेला. महाराजानीं त्याची लाज राखली. बाकींच्या आरोपींना माजिस्ट्रेटनीं अपराधी ठरविलें व आदमला सोडून दिलें. अर्थात् त्याला अति आनंद झाला. पुन्हां तसबिरीकडे गेला व तसबिरीचे व सर्वांचे पायां पडला. संध्याकाळीं त्याचे घरीं एक म्हातारा अनोळखी फकीर आला. तो त्याला म्हणाला "चला आपण दुकानांत चहा पिऊं." फकीर 'बरें' म्हणाला व आदमनें जरा मागें पाहिलें व पुनः पहातो तों फकीर कोठें दिसेना. पुष्कळ शोधलें पण फकीराचा पत्ता लागला नाहीं. दुसरे दिवशीं तो शिर्डीस महाराजांचे दर्शनास निघून गेला.

(२७)

डिवेट्री नांवाचें एक पार्शी गृहस्थ आहेत. ते एकदां महाराजांचे दर्शनास गेले व नोकरी नाहीं, पैशाची अडचण आहे असें महाराजांजवळ गाऱ्हाणें केलें. महाराज म्हणाले 'अल्ला अच्छा करदेगा.' ते परत आले तों लौकरच त्यांना चांगली नोकरी मिळाली व कांहीं दिवसांनीं त्यांचे

स्थावर मिळकतीला फार चांगली किंमत आली व ती विकल्यामुळें त्यांना फार फायदा झाला.

( ३८ )

माझे एक मित्र गेल्या गुरुपौर्णिमेसाठीं शिर्डीस आले होते. त्यांनां महाराज देहधारी असतानां प्रत्यक्ष दर्शन घडलें नव्हतें. महाराजांची कीर्ति त्यांनी ऐकिली होती. आणि महाराजांचे दर्शन घेण्याची त्यांची इच्छाही होती. पण दर्शनाचा योग जुळून आला नाहीं. पण गेल्या पुण्य तिथीचे सुमारास शिर्डीस येऊन महाराजांच्या समाधीचें दर्शन घेण्याची त्यांच्या मनाला अत्यंत ओढ लागली आणि त्याप्रमाणें ते तेथें आले. महाराजांचे कृपेनें ते महराजांच्या चरणीं चांगले रंगले आणि शक्य तितका काळ महाराजांचे उपासनेंत घालवूं लागले. त्यांची आनंदाची स्थिति वारं-वार बाहेर प्रगट हाते, फुटुन निघते म्हटलें तरी चालेल. दोन महिन्यापूर्वी त्यांच्या मुलाकडून (हा मुलगा दूर प्रदेशीं नोकर आहे) आग्रहाचें बोलावणें आल्यावरून ते स्वतःची खुषी नसतानां तिकडे जावयाला निघाले. सुमारे पाउण हिस्सा प्रवास झाल्यानंतर ते एके ठिकाणीं मुक्कामास राहिले. तेथें महाराजांनीं असा दृष्टांत दिला कीं, सरकार स्वारी मोठ्या थाटानें निघाली आहे व त्या स्वारींत सामील होण्यासाठीं त्यांना एक स्वार बोल-वावयास आला आणि ते त्याचेबरोबर गेले. असें स्वप्न पडल्यावर त्यांनीं पुढें जाण्याचा बेत रहित करून आपले घरीं परत फिरले व तेथून गुरुपौर्णिमेच्या उत्सवासाठीं येथें आले आणि येथील महाराजांच्या रथाचे मिरवणुकींत सामील झाले. कांहीं दिवस येथें राहून ते कांहीं मंडळी बरोबर निरनिराळ्या क्षेत्रांचे दर्शन घेऊन आपल्या घरीं गेले ते आपल्या गांवी पहाटे ४ वाजतां पोहचले. त्यांचें घर एका आवारांत आहे. त्या आवाराला एक गेट असून त्या गेटाला आंतून कडी होती. माझे मित्र पहाटे सुमारे ४। वाजतां त्या गेटाजवळ पोहचले आणि पुष्कळ हाका मारिल्या व गेटचे दारही ठोकलें पण त्यांची हांक किंवा दार ठोकणें कोणालाहि ऐकूं गेलें नाहीं. इतक्यांत त्यांच्या घरांतील एका मुलीच्या स्वप्नांत महाराज गेले आणि म्हणाले "निजलीस काय उठ तो × × ×,

चटकन ती मुलगी जागी झाली आणि गेटावर जाऊन दार उघडून पहाते तों ते गृहस्थ महाराजांनीं स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें खरोखरीच गेटा- पाशीं उभे होते.

( ३९ )

एकदां मी शिर्डीस जातेवेळीं मोरेश्वरराव प्रधान मला बोरीबंदरावर भेटावयास आले व सांताक्रुझला आपल्या घरीं गणपती बसवायचा काय हें महाराजांस विचारण्यास सांगितलें. मी त्याप्रमाणें शिर्डीस गेल्यावर महाराजांस विचारलें. महाराजांनीं "होय" म्हणून आज्ञा केली. मी आज्ञा कळविण्यासाठीं मोरेश्वररावास पत्र लिहिलें व महाराजांना विचारून तें त्याच दिवशीं पोष्टांत टाकलें. त्याच रात्रीं पहाटेच्या सुमारास सांताक्रुझ येथें मोरेश्वररावांची मेहुणी-तातीबाई इला स्वप्न पडलें व त्यांत एका कोनाडयांत अतिसुंदर गणपतीची मूर्ति बसलेली तिला दिसली. तिनें तें स्वप्न सकाळीं उठल्यावर घरांत सांगितलें व दुसरे दिवशीं महा- राजांच्या आज्ञेचें पत्र येऊन पोहोंचलें. अर्थात् स्वप्नद्वारा महाराजांनीं अगाऊच सूचना दिली.

( ४० )

महाराजांचा भक्त मेघा नांवाचा होता तो रोज दुपारची आरती करीत असे. तो सर्व देवांच्या पूजा करून मग महाराजांकडे जात असे. एक दिवस तो खंडोबाची पूजा करीत असतांना त्याला दरवाजा उघडेना मग उशीर होत होता म्हणून ती पूजा तशीच टाकून तो महाराजांकडे गेला. महाराज म्हणाले "अजून सगळ्या देवांची पूजा झाली नाहीं. एकाची राहिली आहे. ती करून मग येथें ये." तो म्हणाला "दार बंद होतें म्हणून इकडे आलों." महाराज म्हणाले "जा दार उघडें आहे" मग त्या प्रमाणें तो गेला तों दार उघडें होतें. मग त्यानें यथासांग पूजा केली व मग महाराजांकडे गेला. महाराजांनीं मग त्याला पूजा करूं दिली.

( ४१ )

माझे एक मित्र एक दिवस माझे ऑफिसांत आले व म्हणूं लागले

पण फारशी उपयोग होत नाही' मी त्यांना महाराजांची उदी दिली व ती तीन दिवस घेण्यास सांगितली. दुसरे दिवशी ते माझे आफिसांत आले व म्हणूं लागले "काल रात्रीं मी उदी घेतली व मला रात्रभर फार उत्तम झोंप लागली."

तसेंच बांद्रें येथें राहण्याऱ्या माझ्या एका स्नेह्याच्या मुलाला दोन महिने झोंप येत नव्हती. त्याला त्याच्या बापानें शिर्डीस महाराजांचे दर्शनास नेलें. त्याच रात्रीं त्याला झोंप आली. तेव्हां पासून रोज रात्रीं झोंप येऊं लागली.

(४२)

गेल्या† गुरुपौर्णिमेला मी महाराजांची पूजा केली. त्यांत एक व्यंग राहिलें होतें तें माझ्या लक्षांत आलें नाही. अशा प्रसंगाची पूजा यथासांग झाली पाहिजे. दक्षिणा दिली पण विडा देण्याचा राहिला. नेहमी विडा देण्याची माझी वहिवाट नसल्यामुळें माझ्या लक्षांत आलें नाहीं. तिसरे प्रहरीं महाराजांनी मला बोलाविलं व दोन चार विडे करून आणावयास सांगितलें. मी त्याप्रमाणें विडे करून नेले व महाराजांना दिले. महाराजांनी तावडतोब एक विडा तसाच न कुटतां खाल्ला. अशा तऱ्हेनें महाराजांनी माझी पूजा सांग करून घेतली.

(४३)

एकदां शिर्डीस असतांना रात्री जेऊं नये असें मनांत येऊं लागलें. त्याप्रमाणें घरांत मी सांगितलें की उद्यापासून रात्री जेवायचें नाही. दुसरे दिवशीं दुपारीं महाराजाजवळ बसलों असतांना महाराज म्हणाले "आज रात्रीं जेवायला काय करावयाचें ?" मी म्हटलें "आपण म्हणाल तें." महाराज म्हणाले "नेहमी प्रमाणेंच भात पोळी करावी." मी विचारलें 'आपल्याला नैवेद्य आणू का ?" महाराज म्हणाले 'नको तेथेंच करून खा.' रात्री जेवतांना घरांतल्या मंडळींनीं आदल्या रात्रींच्या ठरावाची आठवण दिली. तेव्हां मी म्हटलें "उद्यांपासून रात्रीं जेवणार नाही." दुसरें दिवशीं पुन्हा महाराजांनी रात्रीच्या जेवणाबद्दल विचारलें. तेव्हां मनाची

† इ. स. १९१८ च्या.

खात्री झाली की रात्रीचें जेवण बंद न करण्याविषयी ही आज्ञा आहे व त्या प्रमाणें तें चालू ठेवलें. मग महाराजांनी पुन्हा विचारलें नाही.

( ४४ )

मुंबईचे एक गृहस्थ श्रीसद्गुरु साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीस गेले होत. परंतु बाबांनी त्यांचेपाशी दक्षणा वगैरे कांहीं न मागतां त्यांना जाण्याची परवानगी दिली. वाड्यांत आल्यावर त्या गृहस्थाचे मनांत बाबांनी आपणापाशी दक्षणा मागितली नाही अशी कल्पना उभी राहून त्यांना थोडेंसें वाईट वाटलें. लगेच थोडे वेळानें बाबांनी अमुक अमुक मनुष्याला बोलावून आण अशी जवळच्या एका मनुष्याला आज्ञा केली. त्याप्रमाणें ते गृहस्थ पुनः मशीदींत गेले व बाबांनी त्यांचे कडून दक्षणा मागून घेतली. अर्थात् त्यामुळें त्यांचे मनाची हुरहुर निघून गेली.

( ४५ )

अंजनवलचे मथुरादास महाराजांचे दर्शनास वारंवार येत. ते सगुण नांवाचा खाणावळवाला आहे, त्याचेकडे उतरत. एकदां ते व सगुण बोलत बसले असतां कांही लोकांच्या उखाळ्या पाखाळ्या निघाल्या. त्यानंतर मथुरादास महाराजांकडे गेले. ते बसल्यानंतर लगेच महाराजांनी विचारलें. "सगुण काय म्हणत होता ? " अर्थात् मथुरादास लाजले व मनांत समजले की सगुणकडे चाललें होतें तें महाराजांस पसंत नाहीं. कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें किंवा त्या ऐकणें चांगलें नव्हे, हा धडा मथुरादासांनी घेतला.

( ४६ )

बाबासाहेब तर्खड एकदां शिर्डीस गेलें असतां दोन प्रहरीं श्रीसद्गुरू साईबाबांनी बाबासाहेबांना वाड्यांत पोथी ऐकावयाला जाण्याची आज्ञा केली. ते दिवशीं पोथीचा विषय ब्रह्माख्यान हा होता; व त्या मध्यें परमेश्वराच्या निर्गुण व निराकार स्वरूपाचें वर्णन होतें. बाबासाहेब पोथी आटोपल्यावर बाबांच्याकडे गेले, व म्हणाले " बाबा, मला दीड वर्षांनीं आणलेंत, मला आपले चरणापाशींच ठेवा." तेव्हां " मी तुझ्यापाशींच आहे असें बाबा म्हणाले."

महाराजांची ही बोधपद्धती इतकी मोहक असे की तिचा प्रत्यक्ष
ाम घडण्यास पुरेसें भाग्यच पाहिजे. हा भाग्योदय होतांच अंतःकरणात
काश पडलाच समजावें.

यासंबंधें एक लहान पण मौजेची कथा आहे ती वाचकांस सादर
रितों. या मासिक पुस्तकाच्या ८ व्या अंकात 'महाराजांचे अनुभव' या
मथळ्याखालीं ६४ वे पृष्ठावर नंबर ३४ खालीं प्रसिद्ध कीर्तनकार हरि-
क परायण माधवबुवा बडोदकर यांचा एक अनुभव प्रसिद्ध झाला
हे. त्यावेळी त्यांना जो दर्शनाचा योग आला त्याबद्दल आणखी असी
कीकत आहे की माधवबुवांचा संकल्प ही संताची भेट रा. रा. भाऊ-
हेब दीक्षित यांच्या समानमें व्हावी असा होता. पण संगमनेराहून
येतांना शिर्डीत भाऊसाहेब नसावेत असी त्यांची खात्री होती म्हणून
जे टांग्यातून उतरले ते एकटेच दर्शनार्थ मशीदीत गेले. पण तेथें
रां त्यांधीच भाऊसाहेब बाबांचेपाशी बसलेले पाहून त्यास जो आनंद
स्थ त्याचें शब्दांनी वर्णन करता येणें अशक्य आहे.
वशी ...

सस्थानसो पुढें माधवबुवा बाबांचे पायां पडून जवळ बसल्यावर परम-
वा भक्तपणें काय ती बाबा आपल्यास सांगतील काय असें त्यांचे मनांत
ल्पना येते तों "वाड्यांत जा व पोथीविधी वाच" म्हणून भाऊसाहेबांस
बांची आज्ञा झाली. भाऊसाहेब नमस्कार करून उठले त्यासरसे माधव-
ही आज्ञा घेऊन उठले. वाड्यांत जाऊन भाऊसाहेबांनी पोथी (एक-
थी भागवत) वाचनास सुरुवात केली इतर श्रोतेमंडळीबरोबर माधव-
ाही ऐकावयास बसले सांगावयाची गोष्ट ती इतकीच की भाऊसाहे-
बा पूर्वीचा कोणताही संकल्प नसतां अगर माधवबुवांनी बाबांस मनातले
ांत केलेली प्रार्थना भाऊसाहेबांस आधी कळविली नसूनही नित्य-
ानुसार आदले दिवशी ज्या जागी पोथीचा विषय संपविला होता.
न पुढें वाचनास आरंभ जो झाला तोच अध्याय १८ मधील १७ वे
का पासून झाला आणि या भागवताच्या एकादशस्कंदाच्या पा
यायाच्या २७ व्या पासून ३७ व्या श्लोकापर्यंतच्या एकनाथ महा-

राजांच्या टीकेंत हंस व परमहंसाची लक्षणें व धर्म यांचेंच सुश्राव्य विवेचन माधवबुवांस ऐकावयास मिळालें. तें ऐकून त्यांना बाबांबद्दल केवढें प्रेम उत्पन्न झालें असेल याची कल्पना वाचकांनीच करावी. साईबाबा स्वमुखानें प्रत्यक्ष उपदेश फारच क्वचित करीत. पण कोणत्याही सदिच्छेनें आलेल्या भक्ताची इच्छा अशा तऱ्हेचे योग आणून पुरविण्याचे कामीं त्यांचा हातखंडा होता. अशीं उदाहरणें व असे अनुभव पुष्कळांस आलेले आहेत.

सदहू माधवबुवा यांचा आणखी असा अनुभव आहे कीं यांस कोपरगांवास लवकर जाण्याची आज्ञा असून टांग्यातून निघावयास थोडा अवकाश लागला. आणि टांगा शिर्डी सोडून सुमारें एक मैल गेला असेल. माधवबुवा टांग्यांत मागले बाजूला बसले होते आणि एकाएकी पाऊस धूमधार सुरू झाला. बुवांचे अंगातले कपडे बहुतेक भिजले व आतां अजून १० मैल रस्ता छाटावयाचा तो सुखानें कसा छाटला जा मोठी काळजी उत्पन्न झाली. तेव्हां "बाबा आतां मला जसें सुखानें दर्शनास आणलेंत तसेंच मला सुखरूपपणें घरीं नेऊन घालावें मोठ्या आनंदानें व भक्तिभावानें बुवांनी प्रार्थना केली आणि व सर्व प्रवासांत पाऊस तर पडतच होता पण नवल हें कीं बुवांचे डो वर किंवा अंगावर ते स्टेशनवर पोंहचून आगगाडींत बसेपर्यंत पाण्याचा एक थेंबही पडला नाहीं! असी बाबांची लीला अगाध आहे.

## पुण्यतिथी उत्सव.

दरसाल प्रमाणें यंदाही गेल्या विजया दशमीचे दिवशीं महाराजांच्या पुण्यतिथीचा उत्सव श्री क्षेत्र शीरडी येथें थाटानें झाला. उत्सवाकरितां, रा. भाऊसाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर, अपोतीद रामचंद्र तर्खड, (सहकुटुंब) रघुवीर भास्कर पुरंदरे, लक्ष्मण गणेश महाजनी, हरेराम बुवा, बाबुलजी शा. वैद्य, दादाजी जीवन पाटील (सहकुटुंब) पुण्याचे अप्पासाहेब गाडगीळ ब्यारीस्टर (सहकुटुंब) व खांडव्याचे पुरुषोत्तम राव इतकीच भक्त मंडळी आली होती.–

–महाराजांचें भक्तमंडळ सहस्त्रसंख्येनें मोजण्यासारखें आहे असें असून, पुण्यतिथीसारख्या महोत्सवाचे समारंभास १०।१५ मंडळी जमावी ही स्थिती फार निराशाजनक आहे. सत्पुरुषांनी समाधि घेतल्यावर त्यांचा खरा उत्सव व स्मृतिदिन म्हणजे पुण्यतिथी. पूर्वकालीन कोणत्याही समाधिस्थ सत्पुरुषाची पुण्यतिथी पाहिली तर त्यांचे बहुतेक शिष्य व भक्त त्या दिवशी समाधिस्थानी हजर राहून तो उत्सव साजरा करतात. श्री रामदासस्वामीचा काळ होऊन आज कांहीं शतकें झाली त्यांचे वेळचे शिष्य किंवा भक्त सध्या हयात नसून त्यांची परंपरा चालवणारे हजारो रामदासी अद्यापही सुज्जनगडावर जमून पुण्यतिथीचा उत्सव करतात. आपल्या श्री साईनाथ महाराजांचा काळ होऊन फक्त काय तीं पांचच वर्षे झाली. इतक्या थोड्या अवधींत त्यांच्या भक्त मंडळांत अशा तऱ्हेची शिथिलता उत्पन्न व्हावी ही स्थिति फारच शोचनीय आहे. ज्या विभूतीनें आपल्या भक्तांकरिता, आपल्या भक्तांचे कल्याण करण्यांत आपला देह कष्टविला, त्या विभूतीच्या स्मरणार्थ वर्षांतून एक दिवस त्यांच्या पुण्यतिथीचें दिवशीं थोडीशी गैरसोय सोसून, भक्त मंडळींनी शीरडीस येऊं नये ही गोष्ट त्यांचे भक्त म्हणविणाऱ्यांला फार कमीपणा आणणारी नव्हे काय? पुण्यतिथीला हजर राहणें यांत महत्पुण्य आहे. पूर्व परंपरा पाहिल्यास गुरू ब्रह्मीभूत झाल्यावर त्यांची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे. वर्षभर घरोघर प्रत्येकजण आपआपली आराधना करतोच आहे परंतु त्याची पूर्तता

करण्याकरितां व सद्गुरूंचा आशीर्वाद गृहण करण्याकरितां पुण्यतिथीला त्यांचे समाधिस्थानींच आलें पाहिजे. पुण्यतिथीचे दिवशीं होणाऱ्या आराधन विधीत तीर्थ राजाची पूजा होते त्यांतील तीर्थाचें सेवन करणें हें पुण्यतिथीला हजर राहिलें तरच साध्य आहे. तीर्थ महिमा काय आहे हें निदान हिंदु समाजाला तरी फोडून सांगण्याची अवश्यकता नाही.

पुण्यतिथीप्रीत्यर्थ शक्त्यनुसार दक्षिणा पाठविणें व प्रसाद मागवून तो ग्रहण करणें येवढेंच केलें म्हणजे आपण आपल्या गुरुऋणांतून मुक्त झालों इतकी मनाची आकुंचित भावना ठेवणें परमार्थदृष्ट्या बिलकुल श्रेयस्कर नाही. हा मार्ग पर्यायरूपी अपरिहार्य अडचणीचे वेळचा आहे.

आतां ही गोष्ट खरी की शिर्डीस महाराजांचे वेळचे दुसरे उत्सव अद्याप चालू आहेत व त्यामुळें कोणत्यांना कोणत्या तरी एका उत्सवाला कित्येक भक्त मंडळी सवडीप्रमाणें जाऊन समाधीचें दर्शन घेतात परंतु गुरूची पुण्यतिथी हा उत्सव सर्वांत प्रमुख मानलेला आहे. सवड असेल त्यांनी इतर उत्सवाला तर हजर राहवेंच; परंतु तितक्यामुळें आपण आपल्या मुख्य कर्तव्यांतून पार पडलों असें खोटें समाधान मानून पुण्यतिथीसारखा महत्वाचा दिवस टाळूं नये.

महाराजानी समाधि विजयादशमीसारख्या साडेतीन शुभ मुहूर्तांतील एका मुहूर्तावर घेतली. हा विजया दशमीचा दिवस कित्येकांच्या आड येत असेल ही गोष्ट आम्हाला माहीत आहे. बहुतेकांच्या घरांत नवरात्र असतें व तो कुलाचारही पाळला पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण इतर व्यावहारिक कार्याचे वेळीं जर आपण नवरात्र धाकट्या भावावर किंवा मुलावर सोपवितों तर आपल्या गुरुकरितां तें तसें दर वर्षी सोपविण्यांत कोणताही प्रत्यवाय नाही. दसरा हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे त्यामुळें रजेची अडचणही नौकरवर्गाला नाही. दसऱ्यासारख्या सणाला आपण घरीं असावें अशी साहजिक इच्छा प्रत्येकाला असणार, कारण त्या दिवशीं सीमोल्लंघन करावयाचें आप्ते-

नां सोनें वाटण्याचे वगैरे विधि असतात. परंतु हे विधि आता औपचारिक राहिले आहेत. त्यांना इतकें महत्व नाहीं. ते गौण आहेत. काय जाऊन तनाची नुसती भोंकें उरलीं आहेत. दसऱ्यासारख्या शुभ मुहूर्तावर सीमोल्लंघन करून मुलुखगिरीवर जाण्याचे दिवस कधींच नष्ट झाले. तावें सीमोल्लंघन करावयाचें तें शिर्डीस करतां येतें. सारांश; महाराजांच्या सर्व भक्तांना आमची हात जोडून कळकळीची विनंती आहे कीं, सर्व भक्त वृंदांनी आपल्या अडचणी बाजूला सारून पुण्यतिथीच्या उत्सवाला शिर्डीस येऊन गुरुसेवेचें पुण्य पदरी जोडीत जावें; असो.

यंदाच्या उत्सवाच्या कार्यक्रमाप्रमाणें विजयादशमीला सकाळी सूर्योदयानंतर रा. ल. ग. महाजनी यांचें हस्तें समाधीवर रुद्राभिषेकाला सुरुवात झाली. अभिषेक सुमारें १०॥ वाजतां संपला नंतर सर्व भक्त मंडळीनी वाद्यांच्या गजरांत समाधीला अत्तर, सुगंधी तेलें वगैरे लाऊन नंतर गंगोदकयुक्त अभ्यंग स्नान घातलें. समाधि कोरडी करून सर्वांनी पूजा केली नंतर महापूजा होऊन महावस्त्रें ( गलेफ ) चढविण्यात आले. १२ वाजतां समाधीपुढें ह. भ. प. मारुतिबुवा यांचे २ वाजेपर्यंत कीर्तन झालें, व नंतर दोन प्रहरची आरती झाली. महाराजांनीं दोनप्रहरीं सुमारें २ वाजून ४५ मिनिटांनी देह ठेविला त्यामुळें तीच वेळ इष्ट काळ धरून त्यांच्या पुण्यतिथीचे दिवशी आरंभी होणारा आराधनविधि त्याचवेळी सुरू करण्यात आला. हा विधी कै. रा. रा. बळवंत सखाराम उर्फ बाळासाहेब माटे यांचें हातानें होत असे, पण १९२१ मध्ये ते आजारी असल्यामुळें तो रा. भाऊसाहेब दीक्षीत यांनी केला. गतवर्षीही दीक्षितांचे हातूनच झाला. यंदा रा. ल. ग. महाजनी यांचें हस्तें तो [illegible] आला. हा आराधन विधि 'नागर खंडा' मध्यें सांगितला आहे.

या विधीप्रमाणें रोजचा नित्य नियम संपल्यावर चार ब्राम्हणांना क्षण देण्यांत आला. या चार ब्राह्मणांची योजना ( १ ) गुरु ( श्रीसाई नाथ महाराज ; स्थानी ( २ ) परम गुरु ( महाराजांचे गुरु ) स्थानी ( ३ ) परमेष्ठी गुरु ( ब्रह्मदेव ) स्थानी व ( ४ ) परात्पर गुरु ( परमे-

धर) त्यानीं अशी विधीपूर्वक केली. या विधींत गुरूनां ब्रह्मीभूत न म्हणतां "विश्वरूपधर असा जो आचार्य त्यांस" असा संकल्प करण्यांत आला. वरील ब्राम्हणांना स्थानापन्न केल्यानंतर त्यांचें पाद प्रक्षालन करून त्यांजकडून आचमन करवून पुरुष सूक्तानें त्यांचें पूजन केलें व

श्लोक

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपं ॥
योगींद्रवंद्यं भवरोगवैद्यं श्रीमद्गुरुं नित्यमहं नमामि ॥ १ ॥

या श्लोकानें त्यांची प्रार्थना करण्यांत आली. नंतर मंडलें करून त्यांवर त्यांची पात्रें मांडून त्यांना पंचपक्वान्नाचें भोजन दिलें. विधींत सांगितल्याप्रमाणें त्यांचें भोजन चालू असतां रा. अण्णासाहेब दाभोळकरांनीं कठोपनिषदांतील पहिली, दुसरी व तिसरी वल्ली म्हटलीं व रा. रा. कृ. जा० भीष्म यांचेकडून आलेलीं खालील २ पद्यें सुरावर गाइलीं.

गजल ताल.

साईनाथा तुझे पायीं ठेवितों दीन मी माथा ॥ ध्रु० ॥

गुणातीता निराकारा प्रभो देवा निर्विकारा ॥
नसुनि तुजला काज धरिसी मनुजरूपा दीनानाथा ॥ १ ॥

कर्म करणें अवश्यकता नसे तुजला गुरुराया ॥
जगदोद्धार तरी करिसी सुलभ सांगूनिया गाथा ॥ २ ॥

चतुर्विध हेतु धरूनीयां भक्त तुजला शरण येती ॥
सकल इच्छा पूर्ण करिसी वरद कर ठेवुनी माथा ॥ ३ ॥

सगुणरूपा धरुनि क्रीडा किति करिसी नसे पार ॥
कृष्ण तव हा दास देवा कसा वर्णील ती आतां ॥ ४ ॥

## साईनाथांची साक्षरता

### पद.

बंजाराचे चालीवर.

तुज शांति हवी जरि कांहीं ॥ धरि साईनाथ पद हृदयीं ॥ ध्रु० ॥

तूं मानव जन्मा येसी ॥ नित पशु सम कर्म करिसी ॥ रे ॥
या देह सुखाचे विषयीं ॥ या देह० ॥ धरीसा० ॥ १ ॥

संसारीं सुख अति थोडें ॥ दुःखाचे डोंगर गाढे ॥ रे ॥
मरसी त्या डोंगर पायीं ॥ मर० ॥ धरि० ॥ २ ॥

सद्भक्त हरी घाबरला ॥ दुःखाचा पडतां घालारे ॥
तो शरण रिघाला साई ॥ तो श० ॥ धरि० ॥ ३ ॥

श्रीरामायण भावार्थ ॥ धरूनिया नाथ भक्तार्थं ॥ रे ॥
तूंवाच म्हणें हे कांहीं ॥ तूं वा० ॥ धरि० ॥ ४ ॥

पति करितां दुःखित तारा ॥ समजावी रघुकुल तारा ॥ रे ॥
हा बोध म्हणें तूं पाही ॥ हा बोध० ॥ धरि० ॥ ५ ॥

ऐसा हा सद्गुरू राणा ॥ नच स्वकिय भक्त करि दैना ॥ रे ॥
अनुभव हा कृष्णही पाही ॥ अनु० ॥ धरि० ॥ ६ ॥

ब्राह्मणांचे भोजन झाल्यावर त्यांना तांबूल दक्षिणा व वस्त्रें दिलीं. नंतर तीर्थराजाच्या पूजेस सुरवात झाली. सांगितलेल्या विधिप्रमाणें गोमयानें सारविलेल्या जमिनीवर चौरंग मांडून सभोवती रांगोळ्या काढून चौरंगावर ठेवलेल्या धान्यावर पाण्यानें भरलेला कलश ठेवला. व तेथें गंगोदकाची भावना धरून तीर्थराजाची स्थापना केली, व पुरुषसूक्त मंत्रपूर्वक पूजा केली. त्यानंतर विधि करणारानें तो कलश मस्तकावर धारण करून ब्राह्मणांचा वेदसूक्तांतील मंत्रघोष चालू असतां अंगावर कलशांतील पाणी सांडेल अशा बेतानें नृत्य करावयाचें असतें, त्याप्रमाणें केलें व पुनः कलश पूर्वोक्त ठिकाणीं ठेविला. पुनः कलशाची पूजा व आरती करून ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालून कलशामधील तीर्थ प्रथम ब्राह्मणांना दिलें व नंतर.

श्लोक.

अविद्यामूल शमनं सर्वपापप्रणाशनम् ॥
गुरु पादोदकं तीर्थं संसारद्रुमनाशनम् ॥ १ ॥

हा श्लोक म्हणून सर्व भक्तवृन्दांनी तीर्थ प्राशन केलें. शेवटीं सर्व कर्म ब्रह्मार्पण करून हा 'आराधन विधि' संपला व नंतर सर्व मंडळींनीं भोजन केलें. संध्याकाळीं पुराण झालें. रात्रीं रथाची मिरवणूक निघाली व ती परत आल्यावर शेजारती होऊन पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

दुसरें दिवशीं दोनप्रहरीं ह. भ. प. जगन्नाथ बुवा यांचें नियृत्तीपर कीर्तन झालें. हे गृहस्थ महाराजांचे हयातीत कांहीं काळपर्यंत शिर्डीस राहिले होते व त्यांचेकडे मुख्य काम महाराजांच्या घोड्याचें असे. महाराजांचे पश्चात यांनीं शिरडी सोडली. व नंतर साधारण अज्ञातवासांतच राहून स्वतःची बरीच उन्नती करून घेतली आहे. याच दिवशीं भंडारा झाला सुमारे १५०० शें पात्र जेऊन उठलें. रात्रीं पालखीची मिरवणूक काढून ती मशिदींत नेली व तेथें ह. भ. प. पिंपळवाडीकर बुवांचें कीर्तन झालें व नंतर महाराज निजत असत त्या ठिकाणीं चावडींत पालखी नेली व तेथें शेजारती झाली. तिसरे दिवशीं सकाळीं गोपाळकाला होऊन दहीहंडी फुटली व उत्सवाची समाप्ति झाली. हें काल्याचें कीर्तन ह० भ० परायण मारुतीबुवा यांनीं केलें व त्यांत श्रीकृष्णाच्या बाललीलांचे वर्णन, गोपाळांसमवेत टिपऱ्यांचे तरतऱ्हेचे खेळ, फुगड्या, रणघोडा वगैरे नाचांचें नाट्य फार मोहक झालें. कीर्तन अगदीं प्रसंगास साजेसें व अति बोधप्रद आणि सुश्राव्य असें होऊन कथा चालत असल्यावेळीं श्रोतृवृंद आपले नित्यव्यवसाय विसरून जणु काय गोकुळांतील प्रेमरसांत व गोपगोपाळांचे समागमांत तल्लीन झाला होता असें दिसलें.

## इतर ठिकाणीं झालेले दुसरें उत्सव.

मुंबई येथें चिखलवाडींत जावजी बिल्डिंग्जमध्यें रा. दाजी विठ्ठल सांबारे वगैरे महाराजांची कांहीं भक्तमंडळी राहतात. पुण्यतिथीचे आदले दिवशीं

या मंडळीचें मनांत यंदा प्रथमच हा उत्सव सार्वजनिक स्वरूपाचा करण्याचें आलें. पूर्वतयारी कांहीं केली नव्हती तरी उत्सव थाटानें पार पडला. पुण्यतिथीचे दिवशीं सकाळीं ६ ते १० पर्यंत श्री साई महाराजांचें तसबिरीसमोर रा. विठ्ठल बाळकृष्ण कल्याणपुरकर यांचें भक्तिरसपरिप्लुत असें भजन झालें. यांची भजन करण्याची पद्धति फार प्रेमळ असल्यामुळें श्रोते मंडळी भजनांत प्रेमानें रंगून जातात. रात्रौ ९ वाजतां श्रीमती बनुबाई विठ्ठल मालवणकर या बाईचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनाची आमंत्रणें पाठविलीं नसूनही कीर्तनास अतिशय गर्दी झाली होती. जागेच्या अभावीं कित्येकांनां परत जावें लागलें. बाईंचा उत्तम अवाज व प्रासादिक वाणी यामुळें कीर्तनास विशेष रंग आला होता. त्यांत शेवटीं जेव्हां बाईनीं पायांत चाळ बांधून ॥ साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥ असें म्हणत नृत्य करून अर्धा तास भजन केलें, तेव्हां बाईतर देहभान विसरल्याच होत्या परंतु श्रोते मंडळीही पूर्ण तल्लीन होऊन गेली होती. श्रीमति बनुबाई या ब्रह्मीभूत बाळकृष्ण महाराज यांच्या शिष्या होत. बाळकृष्ण महाराज पूर्वाश्रमीं राली ब्रदर्समध्यें हेडक्लार्क होते. पुढें त्यांना उपरति होऊन ते निवृत्तिमार्गाकडे वळले. ते शिरडीस साईमहाराजांचे दर्शनास गेले होते. आपल्या गुरूंच्या आज्ञेप्रमाणें श्रीमति बनुबाई आज सुमारें एक वर्षभर कीर्तनें करीत असतात. महालक्ष्मीचें केशवानंद सरस्वती महाराज यांनीं या बाईंना कीर्तनाचें वेळीं घालण्यास एक कफनी दिली आहे व त्यांचाही त्यांना पूर्ण अशिर्वाद आहे.

दुसरा सर्वजनिक स्वरूपाचा उत्सव प्रिन्सेस स्ट्रीटवर कै. रा. अमीदास मेहता यांच्या अनुयायी मंडळींनीं केला. रा. अमीदास मेहता यांची श्री साईनाथ महाराजांवर फार श्रद्धा असे. ते आपल्या हयातींत स्वतः जरी शिरडीस उत्सवाला जात असत तरी शिरडीस न जाऊं शकणाऱ्या आपल्या स्नेही मंडळीकरितां मुंबईत आपल्या जागेंत उत्सव करवीत असत. रा. अमीदासानी " सत्संग " या नांवाची एक संस्था स्थापून तिचे मार्फत गुजराथी भाषेंत महाराजांचे एक लहानसें चरित्र

प्रसिद्ध केलें होतें. यांची प्रकृति बरीच बिघडली तेव्हां अंतकाळ गुरुचरणाजवळ व्हावा म्हणून हे शिरडीस राहण्यास गेले व शेवटी त्यांनी आपला देह गतवर्षी तेथेंच ठेविला. त्यांचे दहन केलेल्या जागेवर त्यांची अनुयायी मंडळी त्यांचे लहानसें स्मारक करणार आहेत.

बांद्रे येथील शिर्डीस न येणाऱ्या भक्तमंडळीनी रा. रा. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचे बंगल्यांत विजयादशमीचे दिवशीं श्रीसाईबाबांचे पुण्यतिथी निमित्त उत्सव केला. ह्या दिवशीं सकाळीं १० ते २ वाजेपर्यंत महापूजा आरती महानैवद्य व भोजन वगैरे झाल्यानंतर दुपारी ३ ते ४ श्रीएकनाथी भागवताचें वाचन झालें व रात्रौ ९ ते १ वाजेपर्यंत ह.भ.प. वे.शा.सं. विष्णुबुवा निजामपुरकर यांचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनास स्त्रीपुरुष मंडळी मिळून अदमासें १२५ हजर होती. कीर्तनाचा प्रतिपाद्य विषय पुण्यतिथीस साजेल असाच होता. त्यांतल्या त्यांत पूर्वनिरूपणांत खालील विषयांवर फारच मुद्देसूद व प्रमाणासह बुवांचे नेहमीचे हातोटी प्रमाणें विवेचन झालें:—

(१) श्रीसद्गुरूची जरूरी

(२) श्रीसद्गुरूची लक्षणें

(३) सच्छिष्याची सद्गुरूवर निष्ठा कशी असावी व

(४) सच्छिष्याचीं लक्षणें.

पूर्वनिरूपणाचा विषय साधारण बहुजन समाजास जरी शुष्क वाटतो तरी बुवांचे मार्मिक, रसाळ व खुबीदार विवेचनामुळें श्रोत्यांचें एवढें लक्ष लागून राहिलें होतें कीं पूर्वनिरूपणांत तीन तास केव्हां गेले हें समजलेंच नाहीं. कीर्तन आटपल्यावर प्रसाद व काफी होऊन उत्सव समाप्त झाला.

इंदुरशहरीं रा. बाळासाहेब रेगे यांचें घरीं इंदुरांतील भक्त मंडळींनीं पुण्यतिथीचा उत्सव केला. सात दिवस भजनी सप्ताह झाला व पुण्यतिथीचें दिवशीं महापूजा होऊन ब्राह्मणभोजन झालें.

## आख्यान--रत्न--माला.

अभिप्राय—आख्यान रत्नमालेचे संग्राहक व प्रकाशक रा. रा. गणेश अनंत सराफ, नांदेड ( निजाम स्टेट ) यांनी मालेचें पहिलें पुस्तक अभिप्रायाकरितां आमचेकडे पाठविलें आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

या पहिल्या पुस्तकाला दोन प्रस्तावना जोडल्या आहेत. एक स्वतः प्रकाशकांची "नारदाची गादी" व दुसरी उमरावतीच्या 'उदय' पत्राचे संपादक कविभूषण रा. रा. बळवंत गणेश खापर्डे यांची. पहिल्या प्रस्तावनेंत प्रकाशकानीं आपलें हृद्गत वाचकांपुढें मोकळें केलें आहे. कीर्तन परंपरेला 'इतिहासाचें पाठबळ' आहे कीं नाहीं याबद्दल प्रस्तावनेंत प्रकाशकानीं बऱ्याच मार्मिक रितीनें ऊहापोह केला आहे. परंतु आमच्या मतें ही परंपरा इतकी स्वयंसिद्ध आहे की तिला प्रोत्साहन देण्याकरितां इतिहासाचें पाठबळ असलें किंवा नसलें तरी दोन्हीं सारखीच आहेत. "हें असलें वाङ्मय भाषेच्या दृष्टीनें अशुद्ध असेल, त्याचें स्वरूप ऐतिहासिक नसेल तर त्याला जागच्याजागी 'राम' म्हणूं देणेंच इष्ट आहे" अशी अनुदारपणाची कल्पना बाळगणाऱ्या सद्गृहस्थांकडे पूर्ण दुर्लक्ष करणें हेंच त्यांना योग्य पारितोषिक होईल.

आपली कीर्तनसंस्था फार जुनी आहे. पूर्वकालीं ज्या वेळीं वाङ्मयाचा हल्लींसारखा प्रचार झालेला नव्हता, त्याकालीं आपल्या धर्माची ज्योत सदैव जागृत ठेवल्याचें बरेंचसें श्रेय आपले कीर्तनकार हरिदास व पुराणिक यांचे कडेच आहे. भारत, भागवत व रामायणासारखे ग्रंथ छापून निघाले नव्हते त्यावेळीं त्यांतील स्वारस्य सर्वसाधारण जन समाजाला कळण्याचा मार्ग आपले कीर्तनकार हा एकच होता. खुद्द शिवाजी महाराजानां कीर्तन पुराण श्रवणाचा फार नाद असे व त्यांच्या हातून पुढें जे महत्कार्य झालें त्याला त्यांचा हा नाद बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला हें इतिहास प्रसिद्ध आहे. अशा उपयुक्त संस्थेच्या उत्कर्षाकरितां जे जे प्रयत्न होतील ते आपल्या उन्नति करितां हवेच आहेत.

कीर्तन संस्था हल्लीं खालावली आहे ही गोष्ट निर्विवाद आहे व त्याला कारण जसें बहुजन समाजाचें औदासिन्य आहे तसेंच चांगल्या हरिदासांची वाण हेंही पण आहे. कदाचित् चांगल्या हरिदासांची वाण पडण्यास कारणही बहुजन समाजाचें औदासिन्यच असेल. हरिदासांना उत्तेजन नाही व त्या मुळें चांगले हरिदास निपजत नाहीत ही गोष्ट जरी खरी असली तरी हरिदासांनी आपल्या परंपरेचा अभिमान बाळगून समाजाचा ओघ आपल्याकडे आकर्षून घेण्याची जबाबदारी आपलेवर आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. कीर्तनाचें निमंत्रण आल्यास कीर्तनाकरितां नव्हे परंतु निमंत्रण देणाऱ्या आपल्या स्नेह्याला बरें वाटावें म्हणून कीर्तनाला केव्हां तरी जाऊन हजिरी देऊन पानसुपारी घेऊन परत यावें ही वातुक वहिवाट अलीकडे समाजांत रूढ होत चालली आहे तिला हरिदासानींच आळा घातला पाहिजे.

चांगल्या हरिदासांच्या कीर्तनाला लोकांच्या उड्या पडतात. नुकतेंच मुंबईंस दोन प्रसिद्ध कीर्तनकार येऊन गेले. पैकीं एक ह. भ. प. दासगणु महाराज हे श्री साईलीलेच्या वाचकांच्या पूर्ण परिचयाचे आहेत. यांच्या कीर्तनाला केवढीही मोठी जागा असो, ती अपुरीच पडत व जागेच्या अभावीं पुष्कळ मंडळी तीन तीन तास ताटकळत उभे राहून प्रेमानें सर्व कीर्तन ऐकतात. दुसरे कीर्तनकार ह. भ. प. डॉ. पटवर्धन. यांची कीर्तनेंही बरींच लोकप्रिय आहेत. दोघांचीही कीर्तनद्वारा शिक्षण देऊन समाजाला विशिष्ट वळण लावण्याची पद्धति फारच चांगली आहे. ह. भ. प. दासगणु महाराजांचीं कीर्तनें भक्तिरसानें ओथंबलेलीं असतात व त्यांच्या कीर्तनानें नास्तिक मनुष्याच्या मनांतहि भक्तीचा प्रादुर्भाव झाल्याची कांहीं उदाहरणें आम्हास माहीत आहेत. सारांश, रा. रा. खापर्डे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, बहुजन समाजांत उपदेश करण्याचें, कीर्तनाप्रमाणें, निदान हिंदुस्थानांत तरी, दुसरें उत्कृष्ट साधन नाहीं व म्हणून आपण ही संस्था कधींहि बुडूं देतां कामा नये.

हा उद्दिष्ट हेतू साध्य होण्याकरितां सर्व बाजूनें प्रयत्न झाले पाहिजेत. मुंबईंत एक संस्था काहीं वर्षांपूर्वी याच उद्देशानें निघाली होती व

कीर्तन मासिक पुस्तक याच संस्थेच्या नेतृत्वाखाली सुरू झालें होतें. परंतु संस्था चिरस्थायी होण्याची खबरदारी तिच्या उत्पादकांनीं न घेतल्या मुळें त्यांच्या अकाली मृत्यूनें संस्था व मासिक दोन्हींहि त्यांचेच बरोबर ल्यास गेलीं. रा. रा. गणेश अनंत सराफ यांचा प्रस्तुतचा प्रयत्न प्रशंसनीय आहे व त्यांनीं हें काम हातीं घेतल्याबद्दल आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. मालेचा उद्देश कीर्तनोपयोगी कविता प्रसिद्ध करून विद्यमान कवी व कवयित्रींची मनें कीर्तन संस्थेकडे वळवून त्यांना प्रोत्साहन द्यावयाचें एवढाच ठेवला तर तिला कवि व कवियित्री यांची संख्या मर्यादित असल्यामुळें त्याचा आश्रयही मर्यादितच मिळेल. परंतु आमच्या मतें हें ध्येय कायम ठेवून पुस्तकांत मनोरंजकपणा ज्यास्ती आणल्यास बहुजन समाजाकडून आश्रय भरपूर मिळेल. मालेंत येणारे विषय मनोरंजक असणारच. परंतु त्यांची मांडणी बहुजन समूहाचें चित्ताकर्षण करील अशा रीतीनें केल्यास दुधांत साखर घातल्यासारखें होईल. प्रस्तुत पुस्तकांत तीन आख्यानें दिलीं आहेत. तीं तीन्हीं मनोरंजक आहेत परंतु त्यांची मांडणी तितकी मनोरंजक झाली नाहीं. गद्य थोडें व कवितांचा सुकाळ झाला आहे. हेंच कवितांच्या आधारानें गद्य वाढवून आख्यान दिलें तर तें खात्रीनें ज्यास्ती मनोरंजक होईल. आख्यान वाचीत असतांना आपण नुसत्या हरिदासाच्या " नोटस् " वाचतों आहोंत असें न वाटतां कीर्तन ऐकतांना जसें मनोरंजन होईल तसेंच तें वाचतांना झालें पाहिजे. आतां ही गोष्ट खरी कीं कवी हरिदासांनीं लिहून ठेवलेलीं आख्यानें मुळांतच अशीं अपुरीं असणार. परंतु त्यांतील हा अपुरेपणाचा दोष काढून टाकतां येण्यासारखा आहे. कवी विद्यमान असल्यास किंवा त्याची परंपरा पुढें चालविणारे त्याचे वंशज अथवा शिष्य असल्यास त्यांच्याकडून गद्यभाग पुरा करून घेतां येईल व हे दोन्ही नसल्यास प्रकाशकांना स्वतः तें कार्य करण्यास कोणताही प्रत्यवाय नाही.

आतां आपण प्रसिद्ध झालेल्या आख्यानाकडे वळूं. पहिलें आख्यान चूडामणिसुत विरचित "वत्सला हरण" दुसरें संतकवि दासगणु विरचित "श्री अहल्याबाई होळकर" व तिसरें रुक्मांगद सुत विरचित "श्री

जयदेव चरित्र" अशीं हीं तीन आख्यानें आहेत. यापैकीं पहिलें व तिसरें ही साधारण एकाच धर्तींचीं, जुन्या पद्धतीचीं आहेत. दोघांची कविता बऱ्यापैकीं व भारदस्त अशी आहे. दोहोंत, वत्सलाहरणांतील कविता सरस आहे. पृष्ठ ४ वरील श्रीकृष्णाचा धांवा फार प्रेमळ आहे. परंतु या दोन्ही कवींच्या पद्यांत अपरिचित शब्दांचा भरणा फार असल्यामुळें व आख्यानांत गद्य भाग अपुरा असल्यामुळें तीं वाचीत असतां बराच रसभंग होतो. दोन्हीं आख्यानांचे विषय मनोरंजक आहेत व जर यांत गद्यभाग पुरा असतां तर तीं वाचतांना मनाचें रंजन चांगलेंच झालें असतें. "श्रीअहल्याबाई होळकर" हें आख्यान वरील दोहोंपेक्षां निराळ्या पद्धतीचें आहे. यांतील कविता फार रसाळ आहेत, त्यांत अपरिचित अथवा कठीण शब्द फारसे नाहींत. दिलेलें गद्यहि साधारण बरें आहे त्यामुळें हें आख्यान वांचतानां दुसऱ्या दोन्हींपेक्षां ज्यास्ती मनोरंजक वाटलें. तथापि यांतील गद्य जर वाढविलें व तें दासगणु महाराजांच्या संमतीनें सहज करतां येईल, तर हें आख्यान आहे त्यांपेक्षां चित्ताकर्षक होईल. गद्य अपुरें असल्यामुळें कित्येक ठिकाणीं तर या आख्यानांत गद्यपद्याची खिचडी झाली आहे. उदाहरणार्थ पृष्ठ १३ मध्यें " पुढें थोडयाच दिवसांत त्यांचे मनोरथ पूर्ण होऊन योग्य कालीं " या अपुऱ्या गद्य वाक्याची पूर्ती त्या पुढील आर्येतून " हरिप्रिय कमला शिंदा पोटीं निजांशें जन्मा येई " हा चरण घेऊन करावी लागते. पुढें त्याच पृष्ठावर शेवटीं " याचावयाला शिकवित असे, त्या " हें गद्य वाक्य पुढील ओवींतील " पंतोजींचें तया अहल्येवरी भारी प्रेम जडलेलें" हा चरण घेऊन पूर्ण करावें लागतें. तसेंच पृष्ठ १५ वरील ( २० ) ओव्यापासून पुढील काव्यरूपी संवाद वाचून आम्ही लहानपणीं पाहिलेल्या उर्दु इंद्रसभा नाटकाची आठवण होते. त्या नाटकांत इंद्राचें पद झालें की उर्वशीचें नंतर दुसऱ्या कोणाचें असें सर्व नाटक नुसत्या पद्यांतच होत असे.

या आख्यानांत श्री अहल्यादेवीचें साधुत्वाचें महिमान वर्णन करतानां जो कथाभाग दिला आहे त्यांत भागिरथीमध्यें नौकेला छिद्र

पडल्यामुळें त्या नौकेंतील काशीला जाणाऱ्या मंडळींनी श्री अहल्या देवीचें स्तवन केलें व त्या मुळें नौका पैलतीरास सुरक्षित पोहोंचली असें वर्णन दिलें आहे. श्री अहल्या या महान साध्वी होत्या व त्यांच्या कृपेनें असा चमत्कार होणें अगदीं शक्य होतें परंतु काशीला जाणाऱ्या महाराष्ट्रीय मंडळींनीं (इंदूर किंवा महेश्वरची नव्हेत) संकटसमयीं त्याचे निवारणार्थ, भागिरथी माता सोडून किंवा समोर दिसणाऱ्या श्रीकाशी विश्वेश्वराला विसरून, अहल्या देवीनां आळवावें हें चमत्कारिक व विसंगत दिसलें. दासगणु महाराजांचें कीर्तन आम्ही ऐकलेलें आहे पण त्यावेळीं हा विसंगतपणा दिसला नाहीं. कदाचित आख्यानांत पूर्ण गद्य न दिल्याचा हा परिणाम असेल. सारांश आमची रा. रा. गणेश अनंत सराफ यांना आग्रहाची विनंती आहे कीं त्यांनीं आख्यानें नुसत्या हरिदासांच्या "नोटस्" या स्वरूपांत न देतां ती पूर्ण स्वरूपांत द्यावी ह्मणजे त्यांचा अंतिम हेतु साध्य होऊन शिवाय इतरेजनांचें पण त्या पासून मनरंजन होऊन या वाङ्मयाची त्यांना गोडी लागेल.

मालेच्या फुटकळ पुस्तकाची किंमत ८ आणे ही जरा ज्यास्ती आहे, परंतु एकदम ३ रु. भरणारास वर्षांतून निघणारी ६ पुस्तकें त्या किंमतींत मिळण्याचीं सवलत ठेवली आहे, तेव्हां या सवलतीचा फायदा घेणें अधिक श्रेयस्कर आहे. कीर्तन वाङ्मयाचें संरक्षण करणें हें नुसतें अवश्यक आहे इतकेंच नव्हे तर प्रत्येक हिंदुधर्माभिमान्यानें तें एक आपलें पवित्र कर्तव्य आहे असें समजून या सत्कार्यास हातभार लावला पाहिजे. वार्षिक ३. रु. म्हणजे फार नाहींत. तेव्हां सर्व श्रीसाई लीलेच्या वाचकांनीं या मालेला आश्रय देऊन स्वार्थ व परमार्थ हीं दोन्ही साधावीं अशी आमची त्यांनां आग्रहाची विनंती आहे.

## श्रीसाईनाथ पद्यावळी

### पद.

श्रीसद्गुरुबाबासाई । तुज वांचुनि आश्रय नाहीं ॥ भूतलीं ॥ धृ० ॥
मी पापी पतित धीमंता । तारणें मला गुरुनाथा झडकरी ॥ १ ॥
तूं शांती क्षमेचा मेरू । तूं भवार्णवींचें तारूं गुरुवरा ॥ २ ॥
चाल ॥ गुरुवरा, मजसी पामरा, आतां उद्धरा,
त्वरित लवलाही । त्वरित लवलाही ॥
मी बुडतों भवभय डोहीं उद्धरा ॥ ३ ॥ श्रीसद्गुरु० ॥

सौ० कृष्णाबाई हिनें रचिलेलें पद.

श्रीगुरुसाई नेई तवपदा ॥ धृ० ॥
तूं गुरुमाई । बाळें तुझीं हीं ॥
चुकवि रे प्रभो चुकवी आपदा ॥ श्री ॥ १ ॥
या भवीं तरण्या । तुज वाचुनिया
मार्ग नसे हो सुलभ आम्हां दुजा ॥ श्रीगुरु० ॥ २ ॥
भक्तिभावें तनुमनधन ओवाळूं
असती तूं प्रभो भक्तांचा कनवाळू
चाल ॥ वससी गोदेच्या तटीं ॥
बोली बोलशी घाटी ॥
भक्तांच्या संकटीं धांवसी तूं सदा ॥ श्रीगुरु ॥ ३ ॥

# अध्याय १० वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः । श्रीकुलदैवतायनमः ।
श्रीसद्गुरुसाईनाथायनमः ॥

जो सर्वलोकहितीं रत । ब्रह्म स्वरूपीं नित्यस्थित ॥
स्मरा तयातें अविरत । प्रेम भरित अंतरें ॥ १ ॥
जयाच्या स्मरणमात्रेंच । उकले जन्ममरणाचा पेंच ॥
साधनांत साधन तें हेंच । नाहीं वेंच कपर्दिक ॥ २ ॥
अल्प प्रयासें अनल्पफळ । अनायासें हाता ये सकळ ॥
जोंवरी हा इंद्रियागण अविकल । तोंवरी पळपळ साधावें ॥ ३ ॥
इतर देव सारे मायिक । गुरूचि शाश्वत देव एक ॥
चरणीं ठेवितां विश्वास देख । रेखेवर मेख मारीतो ॥ ४ ॥
जेथें सद्गुरु सेवा चोखट । संसाराचें समूळ तळपट ॥
न्याय मीमांसादि घटपट । नलगे खटपट कांहींही ॥ ५ ॥
अधिभूत आणि अध्यात्मिक । तिसरें दुःख तें अधिदैविक ॥
तरून जाती भक्त भाविक । होतां नाविक सद्गुरु ॥ ६ ॥
तरूं जातां लौकिक सागर । विश्वास लागे नावाडियावर ॥
तेंच तरावया भवसागर । निजगुरूवर ठेवावा ॥ ७ ॥

पाहोनि भक्तांची भाव भक्ति । करितो करतलगत संविचि ॥
आनंद लक्षण मोक्षप्राप्ति । देतो हातीं लीलेनें ॥ ८ ॥
यद्दर्शनें हृदयग्रंथी । तुटेहो सर्व विषयनिवृत्ति ॥
संचित क्रियमाण क्षयाजाती । गावूं चरितीं तयातें ॥ ९ ॥
अष्टमोध्यायीं जाहलें कथन । नरजन्माचें प्रयोजन ॥
नवमीं भिक्षावृत्तीचें गहन । गूजवर्णन परिसिलें ॥ १० ॥
वायजाबाईची भाजीभाकर । खुशालचंदाचा समाचार ॥
म्हाळसापती तात्यांचा शयनप्रकार । श्रवणसुखकर वानिला ॥११॥
आतां श्रोते दत्तचित्त। ऐका पुढील बाबांचें चरित ॥
कैसे ते राहात कोठें निजत । कैसे विचरत अलक्ष्य ॥ १२ ॥
केवढा लौकिक आयुर्दाय । हिंदूयवनां उभयां माय ॥
वाघाबकऱ्यांच्या विश्वासा ठाय । प्रेमें निःसंशय विहरती ॥१३॥
झाली पोटापाण्याची कहाणी । आतां कैसी साईंची रहाणी ॥
कोठें ते निजत कोण्याठिकाणीं । सादर श्रवणीं श्रोते व्हा ॥१४॥
चौहातीं लांब लांकडी फळी । रुंद एक वीतचि सगळी ॥
झोपाळ्यापरी आढ्यास टांगिली। चिंध्यांहीं बांधिली उभयाग्रीं॥१५॥
ऐशा फळीवरी बाबा निजत । उशापायथ्या पणत्या जळत ॥
केव्हां चढत केव्हां उतरत । अलक्ष्य गति तयांची ॥ १६ ॥
मान वांकवून वरतीं बैसती। किंवा तिच्यावर निद्रिस्त असती ॥
परी ते केव्हां चढती केव्हां उतरती। नकळे ते गति कवणाही ॥१७॥
ऐसी चिंध्यांनीं बांधिली फळी। वजन बाबांचें कैसें सांभाळी ॥
महासिद्धि असतां जवळी । नांवाला फळी केवळ ती ॥ १८ ॥

अतिसूक्ष्म कण डोळां खुपे । तेथें अणिमावंत सुखें लपे ॥
माशी कीड भुंगी या रूपें । संचार सोपे बाबांचे ॥ १९ ॥

अणिमा जयाचे घरची दासी । वेळ कां तयातें होतां माशी ॥
बसेल जो अधांतरीं आकाशीं । मात त्या कायसी फळीची॥२०

अणिमा महिमा लघिमा आदि । अष्टसिद्धि नवनिधि ॥
बद्धांजुली उभ्या जयाच्या संन्निधी। फळी त्या नुसधी निमित्ता॥२१॥

कीड भुंगी सूकर श्वान । पशु पक्षी मनुष्य जाण ॥
राजा रंक थोर सान । समसमान पाही जो ॥ २२ ॥

दिसाया जरी शिरडीनिवासी । साडेतीन हाताची मिराशी ॥
तरी ते सर्व हृदयवासी । पुण्यराशी महाराज ॥ २३ ॥

अंतरीं निःसंग उदास । बाहेर लोकसंग्रहाचा सोस ॥
अंतरीं जरी परम निराश । बाहेर पाश भक्तांचा ॥ २४ ॥

अंतरीं अत्यंत निष्काम । बाह्यतः भक्तांर्थ अति सकाम ॥
अंतरीं निजशांतीचें धाम । बाह्यसकाम संतप्त ॥ २५ ॥

अंतरीं परब्रह्मस्थिति । बाहेर दावी पैशाचवृत्ति ॥
अंतरीं अद्वैत प्रीती । बाह्यतः गुंती विश्वाची ॥ २६ ॥

कधीं पाही प्रेमभावें । कधीं पाषाण घेऊनि धांवे ॥
कधीं शिव्या शापातें द्यावें । कधीं कवटाळावें स्वानंदें ॥ २७ ॥

कधीं शांत दांत उपरत । तितिक्षु सदां समाहित ॥
आत्मस्थित आणि आत्मरत । प्रसन्न चित्त भक्तांसी ॥ २८ ॥

एकासनीं नित्य लीन । नाहीं जयासीं गमनागमन ॥
सटका जयाचें दंडनिधान । तूष्णयतस्थान निश्चित ॥ २९ ॥

नाहीं कीर्ति वित्तैषणा । भिक्षाचर्य प्राण रक्षणा ॥
करूनी ऐशिया योगारोहणा कालक्रमणा करी जो ॥ ३० ॥

प्रत्यक्ष संन्यास वेश यति । सटका तोच दंड हातीं ॥
अल्ला मालीक वाक्यानुवृत्ति । भक्तप्रीति अखंड ॥ ३१ ॥

ऐशी साईंची सगुणमूर्ति । मनुष्यरूपें अभिव्यक्ति ॥
पूर्व पुण्यार्जित ही संपत्ति । अवचित हातीं लाधली ॥ ३२ ॥

तयासी जे मनुष्य भाविती । मंदभाग्य ते मंदमति ॥
विचित्र जयांची दैवगति । तयां हे प्राप्ती कैसेनी ॥ ३३ ॥

साई आत्मबोधाची खाण । साई आनंद विग्रहपूर्ण ॥
धरा कास तयाची तूर्ण । भवार्णव संपूर्ण तराया ॥ ३४ ॥

खरेंच जें अपार अनंत । भरलें आब्रम्हस्तंब पर्यंत ॥
ऐसें जें निरंतर अभिन्न अत्यंत । मूर्तिमंत तें बाबा ॥ ३५ ॥

कलियुगाचा कालप्रसार । चार लक्ष बत्तीस हजार ॥
भरतां स्थूलमानें पांच हजार । झाला अवतार बाबांचा ॥ ३६ ॥

येथें श्रोते आशंका घेती । ठावी नसतां जन्मतिथि ॥
काय आधारें केलें हें निश्चितीं । सादर चित्तीं परिसीजे ॥ ३७ ॥

आनिर्वाणकृतसंकल्पेसीं । होऊनि शिरडी क्षेत्रनिवासी ॥
कंठिले साठ संवत्सरासीं । क्षेत्रसंन्यासी वृत्तीनें ॥ ३८ ॥

सोळा वर्षांचिया वयास । आरंभीं बाबा प्रगटले शिरडिस ॥
तीन वर्षें ते समयास । करूनि वास होते ते ॥ ३९ ॥

तेथून मग जे कोठें सटकले । दूर निजामशाहींत आढळले ॥
ते मग वऱ्हाडासमवेत आले । शिरडीस राहिले अक्षयी ॥ ४० ॥

वीस वर्षें होती वयास । तेथून अखंड शिरडी सहवास ॥
तेथेंच साठ वर्षें वास । सर्वत्रांस हें ठावें ॥ ४१ ॥

शके अठराशें चाळीस । आश्विन शुद्ध दशमीस ॥
विजयादशमीचे सुमूहूर्तास । बाबा निजवास पावले ॥ ४२ ॥

एवं ऐशींचा आयुर्दाय । स्थूलमानाचा हा निश्चय ॥
कीं शके सतराशें साठ होय । जन्म निर्णय बाबांचा ॥ ४३ ॥

काळाच्या माथां देणार पाय । ऐसिया महात्म्यांचा आयुर्दाय ॥
करवेल कधीं निश्चित काय । अवघड हें कार्य साधाया ॥ ४४ ॥

महात्मे नित्य स्वस्थानीं स्थित । जन्म आणि मरण विरहीत ॥
दिनमणीस कैंचा उदयास्त । तो तों अचल स्वस्थ सदा ॥ ४५ ॥

शके सोळाशें तीन सालीं । रामदासांची समाधी झाली ॥
पुरीं दोनही न शतकें गेलीं । उदया आली ही मूर्ति ॥ ४६ ॥

भरत भूमी यवनाक्रांत । हिंदू नृप पादाक्रांत ॥
भक्तिमार्ग झाला लुप्त । धर्मरहित जन झाले ॥ ४७ ॥

तैं रामदास झाले निर्माण । शिवरायातें हातीं धरून ॥
केलें यवनापासून राज्यरक्षण । गोब्राह्मण संरक्षण ॥ ४८ ॥

पुरीं दोनही न शतकें गेलीं । पूर्वील घडी पुनश्च विघडली ॥
हिंदू अविंधीं दुही पडली । ती मग तोडिली बाबांनीं ॥ ४९ ॥

राम आणि रहीम एक । यत्किंचितही नाहीं फरक ॥
मग भक्तांच धरावी कां अटक । वर्तावें तुटक किमर्थ ॥ ५० ॥

काय तुम्ही लेंकरें मूढ । बांधा हिंदू अविंधाची सांगड ॥
व्हा दृढ सुविचारारूढ । तरीच पैलथड पावाल ॥ ५१ ॥

वादावादी नाहीं बरी । नको कुणाची बरोबरी ॥
व्हा नित्य निजहिताचे विचारी । रक्षील श्रीहरी तुम्हांला ॥५२॥

योगयागतपज्ञान । हें सर्व हरिप्राप्तीचें साधन ॥
असून हें जो हरि विहीन । व्यर्थ जनन तयाचें ॥ ५३ ॥
कोणी कांहीं केलिया अपकार । आपण न करणें प्रतिकार ॥
करवेल तरी करा उपकार । उपदेश सार हा त्यांचा ॥ ५४ ॥
स्वार्थास तैसाच परमार्थास । उपदेश हा हितावह बहुवस ॥
उच्च नीच स्त्री शूद्रास । धोपट सकळांस हा मार्ग ॥ ५५ ॥
स्वप्नींच्या राज्याचें वैभव । जागें झालिया जैसें वाव ॥
तैसाच संसार केवळ माव । भावना ही तयाची ॥ ५६ ॥
देहादि सुखदुःखमिथ्यत्व । हेंच जयाचें प्रपंचतत्व ॥
निजानुसंधानें स्वप्न भ्रमत्व । दवडोनी मुक्तत्व साधिलें ॥ ५७॥
पाहोनी शिष्याची बद्धता । अतिकळवळा जयाचे चित्ता
कैसी लाधेल देहातीतता । हेचि चिंता अहर्निश ॥ ५८ ॥
अहंब्रम्हाकारवृत्ति । अखंडानंदाची मूर्ति ॥
निर्विकल्प चित्तस्थिति । येई निवृत्ति विसावया ॥ ५९ ॥
घेऊनियां टाळ विणें । दारोदार भटकणें ॥
आल्या गेल्या केविलवाणें । हात पसरणें ठावें ना ॥ ६० ॥
बहुत ऐसे असती गुरु । शिष्य करिती धरधरूं ॥
देती वळेंच कान मंतरु । सितळनी वित्तार्थ ॥ ६१ ॥
शिष्यास धर्माची शिक्षण । स्वयें अधर्माचें आचरण ॥
त्याचेनि कैसें भवतरण । जन्म मरण चुकेल ॥ ६२ ॥

आपुल्या धार्मिकत्वाची ख्याति । व्हावी झेंडे फडकावे जगतीं ॥
हें लवही न जयाचें चित्तीं । ऐसी ही मूर्ति साईची ॥ ६३ ॥

देहाभिमाना न जेथें वसती । शिष्या ठायीं अत्यंत प्रीति
सदैव जेथें हेंच प्रवृत्ति । ऐसी ही मूर्ति साईची ॥ ६४

नियत आणि अनियत गुरु । असती गुरु दो प्रकारू ॥
एकेकाचा कार्य निर्धारू । स्पष्ट करूं श्रोतियां ॥ ६५ ॥

दैवी संपत्ति परिपक्व करणें । निर्मल होणें अंतःकरणें ॥
एवढेंच अनियत गुरूचें देणें । मार्गी लावणें मोक्षाच्या ॥ ६६ ॥

नियत गुरूशीं होतां सख्य । द्वैत जाऊनि होय ऐक्य ॥
तत्वमसी महावाक्य । तयाची साक्ष तो दावी ॥ ६७ ॥

चराचरीं भरले गुरु । भक्तार्थ होती साकारू ॥
सरतां अवतार कार्यभारु । निजावतारु संपविती ॥ ६८ ॥

या द्वितीय कोटींतील साई । चरित्र तयाचें वर्णूं मी कायी ॥
जैसी तो मज बुद्धि देई । तसेंच होई लेखन हें ॥ ६९ ॥

लौकिकी विद्यांचे अनेक गुरू । स्वरूपीं स्थापी तोचि सद्गुरू ॥
समर्थ तोचि जो दावी भवपारु । महिमा अगोचरु तयाचा ॥७०॥

जो जो जाई कराया दर्शन । तयाचें भूत भविष्य वर्तमान ॥
साई न पुसतां करिती निवेदन । ऊण खूण संपूर्ण ॥ ७१ ॥

ब्रह्मभावें भूतमात्र । अवलोकीं जो सर्वत्र ॥
देखे सम साम्यें अरि मित्र । भेद तिळमात्र नेणे जो ॥७२॥

निरपेक्ष आणि समदर्शी । अपकारियांही अमृत वर्षी ॥
समचित्त उत्कर्षापकर्षीं । स्पर्शी विकल्प ना जयातें ॥ ७३ ॥

वर्ततां या नश्वर देहीं । देह गेहीं जो गुंतला नाहीं ॥
दिसाया देही अंतरीं विदेही । तो येच देहीं निर्मुक्त ॥ ७४ ॥

धन्य शिरडीचे जन । साईच जयांचें देवतार्चन ॥
करितां अशन भोजन शयन । अखंड चिंतन साईचें ॥ ७५ ॥

धन्य धन्य तयांची प्रेमळता । खळ्यांत परसांत कामें करितां ॥
दळतां कांडतां डेरे घुसळतां । महिमा गातात बाबांचा ॥ ७६ ॥

आसनीं भोजनीं शयनीं । बाबांच्या नांवाची अक्षय स्मरणीं ॥
एका बाबावीण दुजा कोणी । देव ज्यांनीं नाठविला ॥ ७७ ॥

काय त्या बायांचा प्रेमा तरी । काय तयांचे प्रेमाची माधुरी ॥
निर्मळ प्रेमचि कवन करी । विद्वत्ता न करी कवनास ॥ ७८ ॥

साधी सरळ भाषा खरी । विद्या नाहीं तिळभरी ॥
त्यांतून जें कवित्व चमक मारी । मान चातुरीं डोलविजे ॥ ७९ ॥

खऱ्या प्रेमाचें आविर्भवन । तया नांव खरें कवन ॥
तें या बायांच्या वाणीमधून । श्रोतीं पाहून घ्यावें कीं ॥ ८० ॥

असेल साईबाबांची इच्छा । पूर्ण संग्रह लाभेल यांचा ॥
पुरेल श्रोतियांची श्रवणेच्छा । अध्याय कवनांचा होईल ॥८१॥

असो निराकार भक्तकृपें । शिरडींत प्रगटलें साईरूपें ॥
देहाहंकार विकार लोपें । भक्ती स्वरूपें ओळखीजे ॥ ८२ ॥

अथवा भक्तांचें पुण्य फळलें । तें प्राप्तकाल वसत मेळें ॥
साईरूपें पूर्ण अंकुरलें । फळा आलें शिरडींत ॥ ८३ ॥

अनिर्वाच्या फुटली वाचा । अजन्म्यासी जन्म साचा ॥
अमूर्ताच्या मूर्तीचा साचा । करुण रसांचा ओतीव ॥ ८४ ॥

यशवंत आणि श्रीमंत । वैराग्यशाली ज्ञानवंत ॥
ऐश्वर्य औदार्य मंडित । षड् गुणान्वित मूर्ति हे ॥ ८५ ॥

विलक्षण बाबांचा निग्रह । स्वयें जरी अपरिग्रह ॥
अमूर्त तरी धरिती विग्रह । भक्तानुग्रह कारणें ॥ ८६ ॥

काय तयांचा कृपाप्रभाव । घेती भक्तांचा जडवूनि भाव ॥
नाहीं तरी तयाचा ठाव । कोण देव गिवसिता ॥ ८७ ॥

वाग्देवता जें वदूं न धजे । श्रवणही जें परिसतां लाजे ॥
ऐसे बोल भक्त कल्याणकाजें । साईमहाराजें वदावें ॥ ८८ ॥

जया शब्दांचा अनुवाद करणें । तयांहून वरें मुकेंच असणें ॥
परी न वरवें कर्तव्या चुकणें । म्हणोनि वदणें प्राप्त झालें ॥८९॥

भक्तकणवा बाबांची वाणी । वदती झाली अति लीनपणी ॥
" दासानुदास मी तुमचा ऋणी । निवालों दर्शनीं तुमचिया ॥९०॥
" ही एक तुमचीच कृपा मोठी । झाली मज तुमचे पायांची भेटी ॥
" किडा मी तुमचे विष्टे पोटीं । धन्य मी सृष्टी तर्णेनी " ॥ ९१ ॥

काय बाबांची ही लीनता । नम्रपणाची ही हौस चित्ता
काय ही उच्च निरभिमानता । शालीनता ही तशीच ॥ ९२ ॥

वरील हे बाबांचें उद्गार । खरें म्हणून केलें कीं सादर ॥
कोणास वाटेल हा अनादर । तरी मी पदर पसरितों ॥ ९३ ॥

विटाळ झाला असेल वाचे । पापही टाळावया श्रवणाचें ॥
आवर्तन करूं साईनामाचें । दोष सकळांचे जळतील ॥ ९४ ॥

जन्मोजन्मींच्या आमुच्या तपा । फळ ती केवळ साईकृपा ॥
तृषार्तासी जैसी प्रपा । तैसी अपार सुखदाती ॥ ९५ ॥

जिव्हाद्वारा रस चाखिती। ऐसे समस्तां जरी भासती ॥
परी ते चाखिलें हें नेणती । रसस्फूर्ति न रसनेसी ॥ ९६ ॥
जयासी नाहीं विषय स्फूर्ति। कैसे तरी ते विषय सेविती॥
विषय जयाच्या इंद्रियां न शिवती। ते काय गुंतती विषयांत ॥९७॥
नयनद्वारें अवलोकिती। पदार्थ जे जे येतील पुढती ॥
परि ते अवलोकिले नेणती। स्फूर्ति देखती तेथना ॥ ९८ ॥
जैसी हनुमंताची गर्भकास । गोचर एक मातेस कीं रामास ॥
मग तयाचे ब्रह्मचर्यास । तुलना कवणास करवेल ॥ ९९ ॥
जेथें माते न लिंगावलोकन । इतरांचें तें काय कथन ॥
बाबांचें ब्रह्मचर्यही परम कठीण। पूर्णपण तें अपूर्व ॥ १०० ॥
कासे कौपीन लंगोटी । लिंग अजागल स्तन कोटी ॥
केवळ मूत्र विसर्ग परिपाठी । अवयवां पोटीं अवयव ॥ १०१ ॥
ऐसी बाबांची देहस्थिती । इंद्रियें जरी कर्मी प्रवर्तती ॥
तरी तयांस विषयस्फूर्ति। लव संविती असेना ॥ १०२ ॥
सत्व रज तमादि गुणां । सवें इंद्रियें खिळिलीं ठाणा ॥
जरी लौकिकी कर्तपणा । संगा कोणा नातळती ॥ १०३ ॥
निःसंग चिन्मात्र आत्माराम । काम क्रोधां विश्रामधाम ॥
बाबा सदैव निष्काम । अवाप्त काम पूर्णत्वें ॥ १०४ ॥
ऐसी तयांची मुक्तस्थिति । विषयही जयांस ब्रह्म होती ।
पुण्य पापाचिया परती । पूर्ण निवृत्ति स्थान तें ॥ १०५ ॥

नानावल्लीनें उठ म्हणतां । गादी सोडून झाला जो परता ॥
जया ठायीं देहाभिमानता । अथवा विषमता स्वप्नीं ना ॥ १०६ ॥
इहलोकीं न मासण्य कांहीं । साध्य परलोकींही उरलें नाहीं ॥
ऐसा हा केवळ लोकानुग्रही । संत ये मही अवतरला ॥ १०७ ॥
ऐसे हे संत करुणाघन ॥ अवतारा येण्याचें प्रयोजन ॥
परानुग्रहावीण ना आन । कृपाळू पूर्ण परहितीं ॥ १०८ ॥
हृदय यांचें जैसें लोणी । अतीव मृदु म्हणती कोणी ॥
परी संत द्रवतील परतापणीं । निज तापेंच पाझरणी लोणिया ॥१०९॥
कफनी ठिगळ्यांची जयाचें वसन । तरट जयाचें आसनास्तरण॥
वृत्ति शून्य जयाचें मन । रौप्य सिंहासन काय त्या ॥ ११० ॥

---

१ नानावल्ली म्हणून एक पिशाच्च वत्तीनें राहणारे धष्टपुष्ट गृहस्थ बरीच मुदत शिर्डीत राहिले होते. त्यांनी तेथें असल्या मुदतींत अतोनात स्वैरवर्तन केलें. श्री साईबाबांच्या दरबारचा बंदोबस्त ठेवण्याकडे त्यांचें फार लक्ष असे. लहर लागल्यास कोणास कवटाळीत तर कोणाच्या थोबाडींतही भडकावीत. कधीं सर्वांग चिखलांत माखवून, कधीं वानर वेष घेऊन व गावांतील पोरांस वानर वेष देऊन सभामंडपांत येत व खुप गडबड करीत असत. श्रीसमर्थावर त्यांचें व त्यांचेवर श्रीसमर्थाचें फार प्रेम असें. एकदां लहरींत येऊन साईबाबांचा हात धरून त्यांजला यांनीं गादीवरून उठविलें व एक मिनिटभर आपण त्यांचे गादीवर बसले आणि लगेच त्यांना अत्यादरपूर्वक गादीवर बसवून त्यांना साष्टांग नमस्कार घातला. हे गृहस्थ साईबाबांस काका म्हणून हाक मारीत व साईबाबांनी देह ठेवल्यापाठीं त्यांनीं जें दुखणें घेतलें त्या दुखण्यानें साईबाबांच्या देहावसानाच्या तेराव्याच दिवशीं त्यांनी काका काका म्हणून आपला देह ठेविला. त्यांचें स्मारक म्हणून शिर्डीस त्यांचे देहावर एक समाधि बांधण्यांत आलेली आहे.

२ परस्यास झालेल्या तापानें.

पाहोनि भक्त भावाकडे । तयास जरी गमलें तें सांकडे ॥
तरी ते लोटितां पाठीकडे । लक्षही तिकडे देतीना ॥ १११ ॥

बाबा शिरडी सरोवरींचें कमळ । भक्त सेविती परिमळ ॥
अभागी भेकांचें वांटयास चिखल । सर्व काळ कालविती ॥११२॥

कोणा न सांगें आसन । प्राणापान वा इंद्रियदमन ॥
मंत्र तंत्र वा यंत्र भजन । फुंकणें कान तेंही ना ॥ ११३ ॥

लौकिकीं दिसती लोका चारी । परी अंतरीची आणिकपरी ॥
अत्यंत दक्ष व्यवहारीं । नये कुसरी दुजयातें ॥ ११४ ॥

भक्तार्थ धरिती आकार । तदर्थचि तयांचे विकार ॥
हे संतांचे लौकिकाचार । जाणा साचार सकळिक ॥ ११५ ॥

साई महाराज संतनिधान । केवळ शुद्ध परमानंद स्थान ॥
तया माझें साष्टांग वंदन । निरभिमान निर्लेप ॥ ११६ ॥

महत्पुण्य पावन तें स्थान । जेथें महाराज आले चालून ॥
गांठीं पूर्ण संचित असल्याचीण । ऐसें निधान दुर्लभ ॥ ११७ ॥

शुद्ध बीजाचीया पोटीं । येती फळें रसाळ गोमटीं ॥
या प्रसिद्ध उक्तीची कसवटी । घेतली शिरडींत लोकांनी ॥११८॥

जो ना हिंदू ना यवन । तया ना आश्रम ना वर्ण ॥
परी करी समूळ निकृंतन । निःसंतान भवाचें ॥ ११९ ॥

अनंत अपार जैसें गगन । तैसें बाबांचें चरित्र गहन ॥
तयांचें तें यथार्थ आकलन । तयावीण कोण करी ॥ १२० ॥

चित्ताचें काम चिंतन । क्षण न उगलें चिंतनावीण ॥
विषय दिल्या त्या विषयचिंतन । गुरु चिंतन त्या गुरु दिधल्या॥१२१

तरी सर्वेंद्रियांचे करून कान । ऐकिलेत जें गुरु महिमान ॥
तें सहज स्मरण सहज भजन । सहज कीर्तन साईचें ॥ १२२ ॥

पंचाग्निसाधन यज्ञयाग । मंत्रतंत्र अष्टांगयोग ॥
द्विजांसीच हे शक्य प्रयोग । काय उपयोग इतरांना ॥ १२३ ॥

तैशा नव्हेत संतकथा । सकलां लाविती त्या सत्पथा ॥
भवभयाची हरिती व्यथा । निज परमार्था प्रकटिती ॥ १२४ ॥

संतकथा श्रवण मनन । परिशीलन व निदिध्यासन ॥
द्विजशूद्र वा स्त्रीजन । येणें पावन होतात ॥ १२५ ॥

प्रेमचि नाहीं जयाचे ठायीं । ऐसा मानव होणेंच नाहीं ॥
कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं । अधिष्ठान पाहीं आनान ॥१२६॥

कोणाचे प्रेमाची जागा संतती । कोणाची ती धनमान संपत्ति ॥
देह गेह लौकिक कीर्ति.। विद्या प्राप्ती कोणाची ॥ १२७ ॥

प्रेम जें विषयीं वाटतें । तें सर्व जें एकवटतें ॥
हरिचरण मुशींत जें आटतें । तें तें प्रगटतें भक्तिरूपें ॥ १२८ ॥

म्हणवूनी देह प्रपंचाला सोपा । चित्त साई चरणीं समर्पा ॥
मग तयाची होईल कृपा । उपाय सोपा हा एक ॥ १२९ ॥

ऐसें याही अल्प साधनीं । महल्लाभ हो घडतो जनीं ॥
तरी या श्रेय संपादनीं । औदासिन्य कैसेंपा ॥ १३० ॥

सहजीं श्रोतियां अंतरीं । आशंकेची उठेल लहरी ॥
महल्लाभ अल्पोपायीं तरी । नादरिती कां बहुजन ॥ १३१ ॥

आहे यासी एकचि कारण । लालसाही नुपजे भगवत्कृपेवीण ॥
तोच भगवंत जई सुप्रसन्न । प्रकटे श्रवण लालसा ॥ १३२ ॥

तरी साईस जाई शरण । कृपा करील नारायण ॥
श्रवण लालसेचें होईल जनन । स्वल्पसाधन हातीं ये ॥ १३३ ॥

गुरुकथेची सत्संगति । धरा उगवा संसार गुंती ॥
यांतचि तुमचें सार्थक निश्चिती । विकल्प चित्तीं न धरावा ॥१३४॥

सोडूनियां लाख चतुराई । स्मरा निरंतर साई साई ॥
बेडा पार होईल पाही । संदेह कांहीं न धरावा ॥ १३५ ॥

हे नाहींत माझे बोल । असती साई मुखींचे सखोल ॥
मानूं नका हो हे फोल । याचें तें तोल करूं नका ॥ १३६ ॥

कुसंग तेथून सर्व खोटा । तो महद्दुःखांचा वसौटा ॥
नकळतचि नेईल अव्हांटा । देईल फांटा सौख्याला ॥ १३७ ॥

एका साईनाथावांचून । अथवा एका सद्गुरूवीण ॥
कुसंगाचें परिमार्जन । करील आन कवणकीं ॥ १३८ ॥

कळवळ्याचें गुरुमुखांतून । निघालें जें गुरुवचन ॥
करा करा भक्त हो जतन । कुसंग निरसन होईल ॥ १३९ ॥

सृष्टिजात डोळां भरते । सौंदर्य लोलूप मन तें रमतें ॥
तीच दृष्टी जें मागें परते । तें तीच रतें सत्संगीं ॥ १४० ॥

इतुकें सत्संगाचें महिमान । समूळ निर्दळी देहाभिमान ॥
म्हणून सत्संगापरतें साधन । पाहतां आन असेना ॥ १४१ ॥

धरावा नित्य सत्संग । इतर संग नित्य सव्यंग ॥
सत्संग एकचि निर्व्यंग । अंग प्रत्यंग निर्मळ ॥ १४२ ॥

सत्संग तोडी देहासक्ति । एवढी बलवत्तर तयाची शक्ति ॥
एथ एकदां जडल्या भक्ति । संसार निर्मुक्ति रोकडी ॥ १४३ ॥

भाग्यें घडल्या सत्संग । सहज उपदेश यथा सांग ॥
तत्क्षणीं विरे कुसंग । रमतें निःसंग मन तेथें ॥ १४४ ॥

व्हावया परमार्थी रिघाव । विषय विरक्ति एक उपाव ॥
न धरितां सत्संगाची हाव । स्वरूप ठाव लागेना ॥ १४५ ॥

सुखापाठीं येतें दुःख । दुःखापाठींच येतें सुख ॥
सुखासी जीव सदा सन्मुख । तोचि विन्मुख दुःखासी ॥ १४६ ॥

व्हा सन्मुख वा विन्मुख । होणार होतें आवश्यक ॥
या उभय भोगांचा मोचक । संगचि एक संतांचा ॥ १४७ ॥

सत्संगें नासे देहाभिमान । सत्संगें तुटे जन्ममरण ॥
सत्संगें भेटे चैतन्यघन । ग्रंथी विच्छेदन तात्काळ ॥ १४८ ॥

पावावया उत्तम गति । पावन एक संत संगति ॥
शरण जातां अनन्य गति । निज विश्रांति आंदणीं ॥ १४९ ॥

नाहीं नाम नाहीं नमन । नाहीं भाव नाहीं भजन ॥
तयां कराया निजपरायण । संत महाजन अवतार ॥ १५० ॥

गंगाभागीरथी गोदा । कृष्णा वेण्या कावेरी नर्मदा ॥
याही वांछिती साधूच्या पदा । येतील कदा स्नानार्थ ॥ १५१ ॥

जगाचीं पातकें स्वयें क्षालिती । परी तयांची पाप निवृत्ति ॥
विना संत पद प्राप्ति । होईना ती कदापि ॥ १५२ ॥

जन्मांतरींचें भाग्य उदेलें । महाराज साईचे चरण जोडले ॥
जन्ममरण द्वारींच ठेलें । भव भय हरलें समस्त ॥ १५३ ॥

आतां संत श्रोते जन । केल्या श्रावणाचें करूं मनन ॥
विसांवा घेऊं आपण । पुढील निरूपण पुढारां ॥ १५४ ॥

हेमाड साईस शरण । मी तो तयाच्या पायींची वहाण ॥
करीत राहीन कथा निरूपण । होईन सुख संपन्न तितुकेंनी ॥१५५॥

काय तें मनोहर गोमटे ध्यान । मशीदीचें कठडयावर राहून ।
करीत एकेका उदी प्रदान । भक्तकल्याण हेतूनें ॥ १५६ ॥

संसार मिथ्या जयाचें ज्ञान । ब्रम्हानंदीं अखंड लीन ॥
मन सदैव उफललें सुमन । साष्टांग नमन तयातें ॥ १५७ ॥

डोळा जे घाली ज्ञानांजन । डायींच पाडी निजनिधान ॥
ऐसें जया साईचें महिमान । साष्टांग वंदन तयातें ॥ १५८ ॥

पुढील अध्याय याहून वरा । अंतरीं शिरतां श्रवण द्वारा ॥
करील पुनीत हृदय मंदिरा । खळ मळ सारा दवडील ॥ १५९ ॥

इति श्री संत सज्जन प्रेरितें । भक्त हेमाडपंत विरचितें ॥
श्री साई समर्थ सच्चरितें । श्री साई समर्थ महिमानं नाम ॥१६०॥

दशमोऽध्यायः । श्रीसाईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ।



# श्री साईनाथ भजनमाला.

## सुधारून वाढविलेली आवृत्ति.

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आता मालेची पुनरावृत्ती छापविणें नाही. साईभक्तांनी माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फारच थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,

रंगार्‍याची चाळ

बांद्रें

बी. बी. सी. आय. रेल्वे.

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ०, जा० भिष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्यांनी सुधारून वाढवि-लेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटलीं जाणारीं पद्यें, व भजनकाळीं म्हणावयाजोगीं मधु शास्त्री भिष्म यांनी तयार केलेलीं पद्यें, परापूजा व मानस-पूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्त-काची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, वांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहते, जि. अहमदनगर.

---

# आख्यान–रत्न–माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवि दासगणू महा-राजांचीहि प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृष्ठ सं. ४८ प्र. पु. कि. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतीत पुस्तक मिळेल.

एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फी. सह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून
ग. रा. नर्मदे यांनी ५ टर्नर रोड वांद्रे येथें